**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश गोपीनाथ मोटे
मु.पो.ता.आटपाडी, जि.सांगली
(सिध्दार्थनगर कॉलनी नं.२)पिन-४१५३०१

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, सांगली विभाग

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन, आटपाडी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९ / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | दि. १४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, सांगली विभाग
श्री.आर.ए.तोरो

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन, आटपाडी
श्री.अ.ने.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२१.६.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
| | श्री.नंदकुमार थोरात यांनी आटपाडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्र.६९/०५नोंद केला आहे. यामध्ये आम्ही दोघांनी केस मागे घेतल्यास एस.टी.ची काही हरकत आहे का, दि.१.११.२००४ रोजी झालेल्या घटनेमुळे वाहकावर मेमो, चार्जशीट आजअखेर दाखल आहे का, असेल तर त्याची छायांकित प्रत. आगार प्रमुखांनी डी.सी.यांना दिलेल्या अहवालाची प्रत. वाहकाने केस मागे घेतल्यास त्याच्या नोकरीस धोका आहे का, नोकरी जाणार नाही ना, प्रशासकीय कार्यवाही होणार का, होणार असेल तर कोणत्या नियमांच्या, कलमांच्या आधारे |

## विवेचन

आटपाडी आगारातील वाहकाने आपल्याविरुध्द केलेली तक्रार मागे घेतल्यास त्यांच्यावर राज्य परिवहन महामंडळाकडून कोणत्या स्वरुपाची कारवाई होईल, अशी माहिती अपीलकर्ता श्री.सुरेश गोपीनाथ मोटे यांनी जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन, आटपाडी, जि. सांगली यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर दिशाभूल करणारे असल्याच्या कारणावरुन श्री.मोटे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, सांगली यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलातील मुद्दयांच्या अनुषंगाने दिलेल्या उत्तरासह दिशाभूल करणारे असल्याचे कारण देऊन श्री.मोटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आटपाडी आगारातील वाहक श्री.नंदकुमार थोरात यांनी पोलिसांकडे केलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी आटपाडी न्यायालयात दाखल केलेल्या खटल्याच्या अनुषंगाने श्री.मोटे यांनी ही माहिती मागितली होती. मात्र भाष्य, तसेच गृहितावर आधारित भविष्यकालीन कारवाईच्या बाबतीत निर्णयाची मागणी असे श्री.मोटे यांनी 'माहिती' या सदरात केलेल्या मागणीचे स्वरुप आहे. तसे त्यांना कळविण्यात आले असल्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी व तोंडी नमूद केले. न्यायालयाचा निर्णय श्री.मोटे यांच्याविरुध्द गेला असून न्यायालयाने त्यांना शिक्षा सुनावली आहे, असेही त्यांनी सांगितले. आपल्याला अपेक्षित अहवाल मिळाला नाही व चुकीची माहिती दिली

गेली, असे प्रतिपादन श्री.मोटे यांनी केले. मात्र २१ जून २००६ रोजीच योग्य ती कागदपत्रे त्यांना देण्यात आली आहेत. विषयाच्या स्वरुपामुळे कागदपत्रे मागवून व तज्ज्ञाचा सल्ला घेऊन कागदपत्रे देण्यात विलंब झाला, असे अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, सांगली श्री.आर.ए.तोरो यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२४.६.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेशकुमार भिमराव आवटी पाटील
दत्तप्रसाद आवटी पाटील मळा, मु.पो.बेडग, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी,
कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मीरोड, पुणे-४११०३० — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा दुग्धव्यवसाय अधिकारी,
सांगली-मिरज यांचे कार्यालय, शासकीय डेअरी, मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१/ सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | दि. १४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेशकुमार भिमराव आवटी पाटील
दत्तप्रसाद आवटी पाटील मळा, मु.पो.बेडग, ता.मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी,
कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मीरोड, पुणे-४११०३० प्रतिनिधी श्री.एस.डी.खाडे

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा दुग्धव्यवसाय अधिकारी,
सांगली-मिरज यांचे कार्यालय, शासकीय डेअरी, मिरज, जि.सांगली श्री.एस.डी.खाडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.७.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.८.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>संचालक मंडळाची (पंचवार्षिक) निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला आहे काय, असल्यास कार्यक्रमपत्रिकेची छायांकित प्रत, नसलेस कधी घेणार. निवडणूक झाली असेल तर नवीन संचालकांची नियमानुसार पात्रता तपासून त्याचा अभिप्राय द्यावा. गैरप्रकार आहे किंवा कसे, असल्यास काय कारवाई केली. | |

## विवेचन

श्री बसवेश्वर दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संस्था मर्यादित, बेडग, ता.मिरज या संस्थेच्या निवडणूक कार्यक्रमासंबंधी व संचालकांसंबंधीची माहिती अपीलकर्ता श्री.सुरेशकुमार भिमराव आवटी पाटील यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा दुग्धव्यवसाय अधिकारी, सांगली-मिरज यांचे कार्यालय यांनी माहिती मुदतीत दिली. परंतु आपल्याला दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिल्याच्या कारणावरुन श्री.आवटी पाटील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय अधिकारी, कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मीरोड, पुणे यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ते फेटाळले व आणखी माहिती आवश्यक असल्यास मागणी करण्याबाबत कळविले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर कारवाई करावी व संबंधित संस्थेच्या निवडणूक प्रक्रियेमधील गैरप्रकाराची संपूर्ण चौकशी करुन योग्य ती माहिती व कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी श्री.आवटी पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिलात केली आहे.

श्री.आवटी पाटील यांनी मूळ अर्जात मागणी केलेल्या चारपैकी तीन मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली. एका मुद्दयामध्ये भाष्य व गृहितकावर आधारित संभाव्य कार्यवाहीची माहिती विचारली होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती' च्या व्याख्येत त्याचा समावेश होत नसल्यामुळे ती दिली नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय अधिकारी श्री.एस.बी.खाडे यांनी नमूद केले. तसेच मूळ अर्जात मागितलेल्यापेक्षा

स्पष्टीकरणात्मक माहिती श्री.आवटी पाटील यांनी प्रथम अपिलात मागितल्याचे त्यांनी कागदपत्रांसह नमूद केले. आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनातही श्री.आवटी पाटील यांनी अपेक्षित केलेला तपशील मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त व नवनिर्वाचित संचालकांची पात्रता तपासण्यासारख्या कार्यवाहीची मागणी करणारा आहे. त्यातीलही काही तपशील श्री.आवटी पाटील यांना आधी देण्यात आला होता, त्यांनतर आयोगाच्या सूचनेनुसार संबंधित सर्व बाबींच्या छायांकित पत्रांच्या प्रती दि.१८.१०.२००७ रोजी अपीलकर्त्यास देण्यात आल्या, असे जन माहिती अधिकारी श्री.एस.बी.खाडे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे.

आयोगापुढे सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याच्या मूळ अर्जानुसारच नव्हे, तर त्यांनी नंतर पाठविलेल्या पत्रांनुसार मागणी केलेली अतिरिक्त माहितीही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुरविली आहे असे दिसते. मात्र मूळ अर्जापेक्षा अधिक व वेगळी माहिती अपिलात करणे नियमानुसार योग्य नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

निवडणूक प्रक्रियेत गैरप्रकार झाले की नाही याची चौकशी करणे हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

## आदेश

अपील फेटाळण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.६.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

जूलै-०८-जून-सोलापूर

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | राजेंद्र साहेबराव गवळी<br>बी-११, राजयोग अपार्टमेंट, स.क्र. ७०/३/१,<br>वडगाव बु., सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१ | हजर |
| ३ | अपिलीय प्राधिकारी | उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश,<br>येरवडा,<br>पुणे -४११ ००६ | हजर |
| ४ | जन माहिती अधिकारी | कार्यालय अधिक्षक, उपसंचालक, भूमी अभिलेख.पुणे, येरवडा, पुणे - ४११ ००६ | हजर |

एकत्रीकरण प्रकरणातील कागदपत्रांच्या नकलांची मागणी अपीलकर्त्याने केली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास वेळोवेळी माहिती देण्यासंबंधी कार्यवाही केल्याचे दिसते.

अपीलकर्त्याने मागितलेली सर्व माहिती दि. १७.१२.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे सर्व घटकांनी मान्य केले. आपली तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याने नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०.६.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रविण दादासाहेब इंदुलकर
१९४९, राजारामपुरी, ११ वी गल्ली, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७ / कोल्हापूर /२००७ |
| २ | विशेष अपील निर्गत मोहीम | दि.१३.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता**

**अपिलीय प्राधिकारी** तथा परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर श्री.अं.चि.पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.३.२००७ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>ऑक्टोबर / नोव्हेंबर २००६ मध्ये एलएलबी (जुना म्हणजेच ३ वर्षाचा अभ्यासक्रम) या परिक्षेच्या उत्तरपत्रिका तपासण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने संबंधित पेपर तपासणाऱ्या व्यक्तिंना दिलेल्या मॉडेल ॲन्सर पेपरबाबत. आसन क्र.२३५७ प्रमाणे दिलेल्या परिक्षा पेपर कॉन्ट्रॅक्ट-१, Tort and Consumer Portectio Laws, Law of Crimes, Family Law १, Administative Law पेपर तपासण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने सदर तपासणी करणाऱ्या व्यक्तीस मॉडेल ॲन्सर पेपर दिले आहेत काय, असल्यास त्याच्या प्रती, तसेच प्रत्येक पश्नासाठी मार्क देण्याची काही नियमावली केली असल्यास त्याची प्रत. |
|---|---|

## विवेचन

ऑक्टोबर-नोव्हेंबर २००६ मध्ये झालेल्या जुन्या एलएलबी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या पहिल्या सत्राच्या परीक्षकांना दिलेल्या नमुना उत्तरपत्रिकेची प्रत, प्रत्येक प्रश्नाला गुण देण्याची नियमावली आदी माहिती अपीलकर्ता श्री.प्रविण दादासाहेब इंदुलकर यांनी जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याचे उत्तर दिले. 'सदर परिक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांचे पेपर तपासण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने सदर पेपर तपासणी करणाऱ्या परीक्षकास सिनॉप्टीक ॲन्सर दिले होते. परंतु वरील विषयाच्या सिनॉप्टीक ॲन्सरच्या झेरॉक्स प्रती आपणास माहितीचा अधिकार कलम ८ (ड) व (ज) खाली देता येणार नाहीत. तसेच प्रत्येक प्रश्नासाठी शिवाजी विद्यापीठाने मार्क देण्याची नियमावली तयार केलेली नाही.' असे त्यांनी या उत्तरात म्हटले होते. त्याविरुध्द श्री.इंगवले यांनी केलेले अपील योग्य शुल्क नसल्याच्या कारणावरुन अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी नाकारले. आपण पाच विषयांच्या परीक्षेला ऑक्टोबर २००६ मध्ये बसलो होतो. त्यात अनुत्तीर्ण झाल्यामुळे मार्च-२००७ मध्ये याच परिक्षेसाठी पुन्हा अर्ज भरला असल्यामुळे विद्यापीठाला परीक्षार्थीकडून अपेक्षित असलेल्या उत्तराची माहिती आपल्याला मिळावी. तसेच विद्यापीठाच्या दंडक क्र.१०६ नुसार उत्तरपत्रिकेच्या प्रती मिळाव्यात असे श्री.इंदुलकर यांनी विविध निवेदनांमध्ये नमूद केले आहे.

श्री.इंदुलकर या विषयाच्या अनुषंगाने आणखी अर्ज व अपिले करीत असल्याचे व त्यांना वेळोवेळी योग्य ती माहिती व उत्तर दिल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात अनुषंगिक कागदपत्राच्या प्रतीसह नमूद केले आहे.

शिवाजी विद्यापीठाचा दंडक १०६-बी नुसार विहित शुल्कासह, विहित मुदतीत अर्ज केल्यानंतर दोन विषयाच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती दिल्या जातात, असे विद्यापीठाने श्री.इंदुलकर यांना कळविले आहे. तसेच मुद्यांच्या स्वरुपाचे नियमाने उत्तर (Synoptic Answer) ते तयार करणाऱ्या परीक्षकाचे नाव गोपनीय रहावे यासाठी देता येणार नाही असे शिवाजी विद्यापीठाने श्री.इंदुलकर यांना स्पष्ट केले आहे. परंतु केवळ दोन विषयाच्या उत्तरपत्रिका देणे पारदर्शकतेला छेद देणारे आहे. तसेच एका उत्तरपत्रिकेच्या छायाकित प्रतीसाठी शिवाजी विद्यापीठामार्फत आकारले जाणारे रु.५००/- हे शुल्क माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम क्र.७(५) च्या तरतुदीची पायमल्ली करणारे आहे असे श्री.इंदुलकर यांचे म्हणणे आहे. अशा स्वरुपाचा बराच पत्रव्यवहार श्री.इंदुलकर यांनी केला असून विद्यापीठाने त्याचे उत्तर दिले आहे. तसेच कुलगुरुंनी त्यांच्याशी चर्चेची तयारीही दर्शविली असल्याची कागदपत्रेही त्यांनी सादर केली आहेत.

उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती देणे बंधनकारक नसल्याच्या व संबंधित विद्यापीठाने परीक्षा प्रक्रियेत काही अंशी गुप्तता पाळणे योग्य असल्याचा निर्णयय सर्वोच्च न्यायालय व मुंबई उच्च न्यायालय यांनी यापूर्वी विविध प्रकरणांमध्ये दिलेला आहे. हे लक्षात घेता मूलभूत हक्क म्हणून आपण मागितलेली ही माहिती मिळालीच पाहिजे ही अपीलकर्त्याची मागणी मान्य करता येणार नाही. मात्र परिक्षा पध्दतीतील पारदर्शकतेत, दोन विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या प्रती शिवाजी विद्यापीठातर्फे दिल्या जातात याचाच अर्थ उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती देण्याचे तत्व विद्यापीठास मान्य आहे असा होतो. या स्थितीत सर्वच परिक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती देता येणे अशक्य नाही. याबाबत विद्यापीठाने विचार करावा. तसेच परीक्षा तपासणीसाचे नाव गोपनीय ठेवून नमुना उत्तरपत्रिका योग्य कालावधीनुसार विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणे परीक्षा पध्दतीतील

पारदर्शकतेच्या दृष्टीने अधिक योग्य व विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरेल. अर्थात या आयोगाच्या सूचना आहेत, विद्यापीठाने त्याबाबत आवश्यक त्या प्रक्रिया लक्षात घेऊन पावले टाकावीत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) आयोगाने केलेल्या सूचना विचारात घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी हा आदेश मिळाल्यापासून एक महिन्यात आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि.१३.६.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२७.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५० / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.हेमंत घनश्याम चोपडे,सोमवार पेठ पोलीस वसाहत, बिल्डिंग क्र.३, खोली क्र.८, पुणे-११. | हजर . |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय, (आस्थापना) पुणे शहर ,पुणे | प्रतिनिधी हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सह पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर ,पुणे | प्रतिनिधी हजर |

अपीलकर्ता श्री. हेमंत घनश्याम चोपडे यांनी बॉम्ब शोधक व नाशक पथकात कार्यरत असलेल्या कार्यपध्दतीबाबत एकूण सहा मुद्दयांची माहिती मागितली होती.

एकूण सहा मुद्दयांपैकी दोन मुद्दयांची माहिती देण्यात आली आहे. प्रशिक्षण का पूर्ण केले नाही, याची कारणे द्या, हवालदार श्री. कदम हे बी.डी.डी.एस. पुणे येथे कर्तव्य करणेस लायक आहेत काय, अशासारखी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येत बसत नाही. त्याव्यतिरिक्तची देय माहिती दिली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य.

२. उर्वरित देय माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क देऊन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पुणे शहर, यांनी दि. १०.७.२००८ पर्यंत पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. ३० .६.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**